महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र. एएससी २५१९/प्र.क्र.८६/१४-अ,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४१७२
दिनांक : १९ जून, २०१९

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- दर्शनिका विभागातील "अधिक्षक" हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ:- १) सा.प्र.वि. शा.नि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का. १२, दिनांक १७-१२-२०१६
२) सा.प्र.वि., शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२०/१४, दिनांक ३१.८.२०१७
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा क्र.दर्शनि-२०१९/प्र.क्र.१४/सां.का.-२, यांचा दिनांक २१-०५-२०१९ चा प्रस्ताव.

महोदय/महोदया,

सा.प्र.वि. शा.नि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७-१२-२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, संदर्भ क्र.२ येथील दिनांक ३१-८-२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदरहू कार्यपध्दतीस अनुसरुन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्त्याखालील दर्शनिका विभाग, मुंबई येथील "अधिक्षक" हे रिक्त पद मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून भरण्याबाबत संदर्भाधिन क्रमांक ३ येथील प्रस्तावा अन्वये विनंती केली आहे. त्यास अनुसरुन खालील तक्त्यातील स्तंभ क्र.४ येथील पदावर मंत्रालयीन संवर्गातील सहायक कक्ष अधिकाऱ्यांकडून पद प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता इच्छुकता मागविण्यात येत आहे :-

अ.क.	कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग, मुंबई कार्यालयातील पदनाम	वेतनश्रेणी	मंत्रालयीन संवर्गातील पदनाम
१	२	३	४
१.	अधिक्षक	९३००-३४८०० (ग्रे.वे.४३००/-)	सहायक कक्ष अधिकारी

२. उपरोक्त पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरिता इच्छुक मंत्रालयीन विभागातील, सहायक कक्ष अधिकारी यांनी आपल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे अर्ज सादर करावा कोणत्याही परिस्थितीत या विभागाकडे थेट अर्ज करु नयेत तसेच प्रत देखील अंकीत करु नये, थेट प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

३. सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी इच्छुक कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्जांची छाननी करुन खालील माहितीसह आपल्या विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने इच्छुक कर्मचाऱ्यांचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव खालील माहितीसह या कार्यासनाकडे दिनांक ०३-०७-२०१९ पर्यंत पोहोचेल अशारीतीने (नोंदणी शाखेत पाठवू नये) पाठवावा:-

१)	कर्मचाऱ्याचे संपूर्ण नांव व पदनाम	
२)	जन्मदिनांक	
३)	सेवानिवृत्तीचा दिनांक (पहा शा.नि.दिनांक १७-१२-२०१६ मधील तरतुद ५ (ब) (६)	
४)	शैक्षणिक अर्हता	
५)	भ्रमणध्वनी क्रमांक	
६)	मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)	
७)	मत्ता व दायित्व सादर केली आहेत का? (दि.३१.३.२०१९ रोजीचे)	
८)	५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास)	
९)	संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास त्याबाबतचा तपशील (पद, ठिकाण व कालावधी)	
१०)	संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे काय?	

४. एकदा निवड झालेल्या कर्मचाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, आपल्या विभागातून सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी जाण्यास कोणीही कर्मचारी इच्छुक नसल्यास तसेही कृपया दिनांक ०३-०७-२०१९ पर्यंत या विभागास कळविण्यात यावे.

५. सद्य:स्थितीत शासनाने सरळसेवा भरतीवर निर्बंध घातले असल्याने, प्रतिनियुक्तीने रिक्त होणाऱ्या पदावर तत्काळ कर्मचारी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. तथापि सरळसेवा व पदोन्नतीमधून ज्या प्रमाणात उमेदवार उपलब्ध होतील त्या प्रमाणात विभागातील रिक्त पदांच्या टक्केवारीनुसार विभागास, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येतील याची विभागांनी नोंद घ्यावी.

६. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात येत आहे.

७. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०६१९१५३११९८५०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

Gajanan
Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.06.19 15:28:56 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, २७, बरजोरजी भरुचा मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००२३ यांना माहितीस्तव सादर.

२) उप सचिव (सां.का.-२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

३) सा.प्र.वि./१४-अ (संग्रहार्थ).